अधिकारी/ कर्मचारी नांव व पदनाम

## कार्यालयीन टिप्पणी

प्रधानमंत्री आवास योजना कक्ष
दि. १३/०४/२०२६

**विषयः-** प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० मधील घटक क्र. ०२ AHP अंतर्गत मौजा – नारी, ख. क्र. ९६/४ येथील जागेवर ५१८ EWS सदनिकांकरिता ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याच्या कालावधीत वाढ करणेबाबत.

संदर्भ:- मा. आयुक्त महोदयांनी दि.११/०४/२०२६ रोजी दिलेल्या निर्देशानुसार.

सादर,

कृपया पुर्व पृष्ठा वरील टिपणीचे अवलोकन व्हावे. सबब प्रकरणी पुढील प्रमाणे सविनय सादर,

१. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० मधील घटक क्र. ०२ भागीदारी तत्त्वावर परवडणारी घरे (Affordable Housing in Partnership) (AHP) अंतर्गत नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजा – नारी, ख. क्र. ९६/४ येथील १६१०३ चौ. मी. जागेवर ५१८ EWS सदनिकांचे प्रकल्प अहवालास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) ची दि.१८/०६/२०२५ रोजीची ३ री बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

२. महा. शासनाचे बिंदु नियमावली बाबत दि. ६ जुलै २०२१ व Person with Disability Act, २०१६ व यापूर्वी अंमलात आनलेल्या घोरणानुसार सदर प्रकल्पातील ५१८ EWS सदनिकांचे वाटप करणेकरिता खालीलप्रमाणे प्रवर्ग निहाय सदनिकांचे आरक्षण राखीव ठेवण्यास मा. आयुक्त महोदयांची मान्यता प्राप्त आहे.

| जाती निहाय प्रवर्ग | अ.जा. (SC) १३% | अ.ज. (ST) ७% | इ.मा.व. (OBC) ३०% | अराखीव (Open) ५०% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|
| **अ) १ BHK चे एकूण २१० सदनिका करिता -** | | | | | |
| दिव्याग प्रवर्गाकरिता समांतर आरक्षण ५% नुसार प्रस्तावित राखीव सदनिका | १ | १ | ३ | ५ | १० |
| दिव्याग प्रवर्ग वगळता प्रस्तावित राखीव सदनिका | २६ | १४ | ६० | १०० | २०० |
| **एकूण (अ)** | **२७** | **१५** | **६३** | **१०५** | **२१०** |
| **ब) २ BHK चे एकूण ३०८ सदनिका करिता -** | | | | | |
| दिव्याग प्रवर्गाकरिता समांतर आरक्षण ५% नुसार प्रस्तावित राखीव सदनिका | २ | १ | ५ | ८ | १६ |

D:\~WRL२८१७.tmp

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिव्यांग प्रवर्ग वगळता प्रस्तावित राखीव सदनिका | ३८ | २१ | ८७ | १४६ | २९२ |
| एकूण (ब) | ४० | २२ | ९२ | १५४ | ३०८ |
| एकूण (अ+ब) | ६७ | ३७ | १५५ | २६० | ५१८ |

३. सदर प्रकल्पातील सदनिकांची विक्री करिता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली असून महानगरपालिकेच्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याचा मूळ कालावधी दि.२४/०२/२०२६ ते ३१/०३/२०२६ पर्यंत असून दि.०१/.०४/२०२६ ते १५/०४/२०२६ पर्यन्त प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

४. मनपाचे Dashboard नुसार सदर कालावधीत आज दि. १३/०४/२०२६ पर्यन्त एकूण खालील प्रमाणे अर्ज प्राप्त आहे.

| Scheme Details | 1 BHK | 2 BHK | Both |
|---|---|---|---|
| Total Applications | ८३८ | ११२५ | १७६ |
| Payment Pending | १३७ | २९८ | १२७ |
| Payment Completed | ७०१ | ८२७ | ४९ |
| Total | | १५७७ | |

५. सदर प्रकल्पाचे भूमीपूजन करणे संबंधी मा. आयुक्त महोदयांनी दि.११/०४/२०२६ रोजी स्थळ पाहणी केलेली असून सदर प्रकल्पातील सदनिकांकरिता अर्ज ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १५/०४/२०२६ असून सबब कालावधीत किमान १५ दिवसांची वाढ करण्याचे निर्देश दिलेले आहे.

करिता, मौजा नारी येथील ५१८ EWS सदनिकांकरिता ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याचे कालावधी दि. १५/०४/२०२६ रोजी संपुष्टात येत असून सदर कालावधीत किमान १५ दिवस म्हणजेच दि. १६/०४/२०२६ पासून दि. ३०/०४/२०२६ पर्यन्त वाढ करणे तथा वर्तमान पत्रात प्रारूप जाहिरात प्रसिद्ध करण्याचे प्रस्ताव मा. आयुक्त महोदयांचे मंजुरीस्तव तथा पुढील आदेशार्थ सविनय सादर.

13/04

प्रतिक गजभिये,
प्रकल्प अभियंता, CLTC

सुनिल उईके
कार्यकारी अभियंता
(प्रआयो)

13/04/26

सचिव, झोपूप्रा / अ.अ.
(pwd) तथा मा. मु. अ.

13/4

मा. आयुक्त
तथा मु.का.अ.

As proposed

No.: 1129 /MC
Date: 15/04/26

D:\~WRL2899.tmp